# बेळगावात संपन्न होत असलेल्या ९५व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षा श्रीमती फैय्याज यांचे अध्यक्षीय भाषण

मी फैय्याज. आजच्या नाट्यसंमेलनाची अध्यक्षा, अभिनेत्री आणि गायिका. तुम्हा सर्व नाट्यरसिकांना वडीलधाऱ्यांना, सर्व रंगकर्मींना आदरपूर्वक, प्रेमपूर्वक प्रणाम करते.

मी अभिनेत्री, गायिका असले तरीही लेखिका, समीक्षक नाही. एक कलावंत आणि रसिक प्रेक्षक म्हणून मी आज बोलणार आहे. गेली ५० वर्षे व्यावसायिक रंगभूमीवर काम करत असल्यामुळे माझ्या संग्रही काही अनुभव जमा झाले आहेत. तसेच एक रसिक प्रेक्षक म्हणून मी अनेक नाटकांचा आस्वादही घेतलेला आहे. त्या अनुषंगानेच मी तुमच्याशी हितगुज करणार आहे, गप्पा मारणार आहे, माझे विचार मांडणार आहे.

आपल्या मराठी रंगभूमीला समृद्ध परंपरा आहे, तिला स्वतःची म्हणून एक संस्कृती आहे. मराठी नाट्यआविष्काराच्या विविध पद्धती आहेत. आपली रंगभूमी विविध स्तरांवर, पातळयांवर काम करते आहे.

मला असं वाटतं की मराठी रंगभूमी ही एखाद्या विशाल वटवृक्षासारखी आहे. जिला अनेक शाखा आहेत, मुळं आहेत. त्या सगळ्यांच्या सहकार्याने, प्रेरणेने, प्रयत्नाने या रंगभूमीचा महान वृक्ष चैतन्याने सळसळतो आहे. मग आपण असे म्हणूया की बाल, हौशी, कामगार, प्रायोगिक/समांतर, लोककला, संगीत आणि व्यावसायिक या नाट्यवृक्षांच्या शाखा आहेत. आणि मुळं आहेत ती भारतीय संस्कृतीची, परंपरेची.

मी या विविध प्रकारच्या शाखांचा माझ्यापरीने धांडोळा घेणार आहे. माझे त्यात असलेले योगदान नमूद करणार आहे. त्याची बलस्थाने, पूर्वीची स्थिती, सद्य स्थिती आणि त्यातल्या त्रुटी, उपाय माझ्या बुद्धीनुसार, क्षमतेनुसार मांडणार आहे.

माझी एकच एक इच्छा आहे की आपली ही मराठी रंगभूमी सर्वार्थानं समृद्ध व्हावी, संपन्न व्हावी, परिपूर्ण व्हावी, आशयघन व्हावी आणि तिचा लौकिक त्रिखंडात पसरावा.